# आदेश निशाणी क्र. १ खाली

(दिनांक ०७/११/२०२३ रोजी पारीत)

१) अर्जदाराची सासु नामे सोजाबाई मोतीराम न्हावी हिची मृत्यु तारीख ०१/०५/१९९५ असल्याची नोंद करणेचे आदेश देणेसाठी महाराष्ट्र जन्म–मृत्यु कायद्याचे कलम १३(३) नुसार सदरचा अर्ज दाखल करणेत आला आहे.

२) सदरचे अर्जात म्हटले आहे की, सोजाबाई ही अर्जदाराची सासु आहे. शासकीय अभिलेखात तिचे मृत्युची नोंद झालेली नाही. सोजाबाई हिचा मृत्यु मौजे शिरसाळे बु., ता. अमळनेर, येथे तारीख ०१/०५/१९९५ रोजी झालेला आहे. अर्जदार व त्याचे कुटुंबातील सदस्य निरक्षर असल्याने व त्यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे त्यांच्या सासुच्या मृत्युची नोंद करणेचे अनावधानाने राहुन गेले. तिचा मृत्यु नोंदीचा दाखला शासकीय व निमशासकीय कामाकरीता आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करणेत आला आहे.

३) मी अभिलेखाचा बारकाईने अभ्यास केला व अर्जदाराचे विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकले. अर्जदार दिलीप लक्ष्मण निकम यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १३ वर दाखल करणेत आले आहे. त्यात त्यांनी मुळ अर्जातील कथनांप्रमाणे कथने केली आहेत. अर्जदाराने त्याचे अर्जातील मागण्यांना आधार देणेसाठी पुराव्यादाखल ग्रामसेवक, शिरसाळे बु., ता. अमळनेर यांनी दिलेले मुळ मृत्यु नोंद अनुपलब्धता दाखला नि.क्र. १८ वर, अर्जदार याचे आधार कार्डाची सत्यापित छायांकीत प्रत नि.क्र.१९ वर, मयत सोजाबाई मोतीराम न्हावी हिच्या रहिवास पुरावा म्हणुन तिच्या नांवाचा ७/१२ उतारा नि.क्र.२० वर व दैनिक “पुण्यप्रताप”, दि.०४/०४/२०२३ या वर्तमानपत्रातील जाहीर नोटीस नि.क्र.११ वर दाखल केलेली आहे. तसेच सामनेवाला नं.१ विरूध्द विना म्हणणे प्रकरण पुढे चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. सामनेवाला नं. २ चे म्हणणे नि.क्र.२१ वर दाखल आहे.

४) अर्जदाराचे तोंडी पुराव्यावरून व ओळखपत्रावरून असे स्पष्ट होते की, तो मौजे शिरसाळे बु., ता. अमळनेर, जि. जळगांव येथील मुळ रहिवासी असुन सध्या तो संभाजी नगर,

भोर मळा परीसर, गोरे वाडी, नाशिक, ता. जि. नाशिक येथे राहतो. निशाणी क्र. १८ वरील दाखल्यावरून असे दिसते की, ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिरसाळे बु, ता. अमळनेर येथील शासकीय अभिलेखात सोजाबाई हिची मृत्युची नोंद झालेली नाही. तिच्या मृत्युची नोंद करणेस झालेल्या विलंबाकरीता त्यांचे कुटुंबातील सदस्य निरक्षर असल्याने त्यांना कायद्याचे ज्ञान नसल्याचे कारण मला समाधानकारक वाटते. प्रस्तुत अर्ज मंजुर करणेस कोणाचीही हरकत न आल्यामुळे अर्जदाराने दिलेला कागदोपत्री व तोंडी पुरावा नुसार त्याची मागणी अबाधित राहिली. त्यामुळे सोजाबाई मोतीराम न्हावी हिचा मृत्यु दिनांक ०१/०५/१९९५ रोजी झालेला असल्याचा निष्कर्ष काढणेस मला कोणतीही अडचण दिसत नाही. वरील कारणांचा विचार करता मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१) अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२) याद्वारे असा आदेश देणेत येतो की, आवश्यक ती फी आकारून सोजाबाई मोतीराम न्हावी हिचा मृत्यु दिनांक ०१/०५/१९९५ रोजी झालेला असल्याची नोंद संबंधित रजिस्टरमध्ये करावी.

ठिकाण:– अमळनेर.
दिनांक :– ०७/११/२०२३.

**( नि. र. यलमाने )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
अमळनेर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mukesh G. Patil, |
| Name of the Court | : | Jt. C.J.J.D & J.M.F.C.,<br>Amalner (Dist. Jalgaon) |
| Date of Judgment/Order | : | 07/11/2023 |
| Judgment/Order signed by<br>the Presiding Officer on | : | 07/11/2023 |
| Judgment/Order upload on | : | 08/11/2023 |